आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केरळमधल्या वायनाड दुर्घटनेतल्या बचावकार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून आपतग्रस्त भागाचं हवाई सर्वेक्षण
- बँकिंग क्षेत्रात बहुप्रतिक्षित सुधारणा सरकार राबवत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची मंजुरी

**आणि**

- ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><>**

वायनाड इथं ३० जुलै रोजी दरड कोसळून झालेल्या दुर्घटनाग्रस्त प्रदेशाला भेट देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज केरळ दौऱ्यावर गेले आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांनी आपतग्रस्त प्रदेशाचं हवाई सर्वेक्षण केलं. तसंच बचाव आणि मदतकार्याची माहिती घेतली. केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यावेळी प्रधानमंत्र्यांसोबत होते. प्रधानमंत्री मदत शिबिरं तसंच रुग्णालयांनाही भेट देतील. दुर्घटनेत जखमी झालेल्यांशी आणि मृतांच्या कुटुंबीयांशी ते  संवाद साधणार आहेत. या दुर्घटनेला राष्ट्रीय आपत्ती घोषित करावं अशी मागणी राज्य सरकार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या विरोधी पक्षांनी केली आहे.

दरम्यान, वायनाडमध्ये केंद्र सरकारने राबवलेल्या बचाव कार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश आलं आहे, तर ५२० जणांना सुरक्षित स्थळी हवलण्यात आलं. घटनास्थळावरून ११२ मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार-विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या २४ हजार ६५७ कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातल्या जालना - जळगाव ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचाही समावेश आहे. या मार्गामुळे युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात समावेश असणाऱ्या अजिंठा लेण्यांकडे जाणं सोयीचं होणार आहे. तसंच विदर्भ आणि मराठवाडा भागासाठीही हा मार्ग फायदेशीर ठरणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी भागासाठीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या योजनेला तसंच ग्रामीण भागात २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षातल्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी नवी घरं बांधण्यात येणार असून, त्यापैकी दोन कोटी घरं ग्रामीण भागात, तर एक कोटी घरं शहरी भागात बांधली जाणार आहेत. या योजनेसाठी तीन लाख साठ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड--बाईट - शिवाजी साटम**

**<><><><><>**

सरकार बँकिंग क्षेत्रात बहुप्रतिक्षित सुधारणा राबवत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाशी संवाद साधताना बोलत होत्या. बँकिंग नियमन सुधारणांची दीर्घ काळापासून गरज होती असं त्यांनी सांगितलं. केंद्रीय अर्थसंकल्पानंतर तसंच लोकसभेनं काही सुधारणांसह वित्त विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर ही बैठक घेण्यात आली. बँकांनी आपल्या व्यवहारात कोअर बँकिंगवर लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर अर्थमंत्र्यांनी भर दिला.

**<><><><><>**

महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पानंतर नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजुरी दिली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली. या योजनेतून पश्चिमी वाहिनी नार-पार-गिरणा या नदीखोऱ्यातून १० पूर्णांक ६४ शतांश टीएमसी पाणी वापर प्रस्तावित असून त्याचा लाभ नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातल्या ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला होणार आहे. ७ हजार १५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून राज्याच्या जलसमृद्धीच्या दृष्टिने हे आणखी एक ऐतिहासिक पाऊल ठरेल, असं फडणवीस त्यांच्या संदेशात म्हणाले.

**<><><><><>**

रस्त्यावरचे खड्डे बुजवण्यासाठी “लिओ पॉलिमर तंत्रज्ञान” वापरण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना काल दिल्या. ठाणे नाशिक महामार्गावरच्या खारेगाव ते पडघा, तळवली ते शहापूर या रस्त्याची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. या महामार्गावरची प्रलंबित कामं तातडीनं पूर्ण करावी तसंच कामात अडथळा आणणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी असं मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला सांगितलं.

**<><><><><>**

काँग्रेस पक्षाचा लातूर, धाराशीव, बीड जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांचा मेळावा आज लातूरमध्ये होत आहे. या मेळाव्यात विधानसभा निवडणुकी संदर्भात चर्चा होणार असून काँग्रेसच्या मराठवाड्यातल्या नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार होणार आहे. या मेळाव्याला काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, अमित देशमुख उपस्थित आहेत.

**<><><><><>**

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यादरम्यान आज आकाशवाणी मुंबई केंद्राला भेट दिली आणि सर्व विभागांच्या कामाचा आढावा घेतला. श्रोत्यांना आवडण्याजोग्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना त्यांनी आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांना बैठकीदरम्यान केली. युवा आणि महिला केंद्रित कार्यक्रमांवर अधिक भर **द्या**वा, आर्थिक आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने अधिकाधिक कार्यक्रम जाहिरातदारांपर्यंत घेऊन जावेत, असा सल्लाही त्यांनी दिला. वृत्तविभागाच्या प्रमुख सरस्वती कुवळेकर, कार्यक्रम प्रमुख नारायण पवार, कार्यालय प्रमुख श्रीकृष्ण क्षीरसागर यांच्यासह आकाशवाणी आणि दूरदर्शनचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सॅमसंगसाठी भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी बाजारपेठ असल्याचं सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सचे  मुख्य कार्यकारी अधिकारी जोंग- ही यांनी सांगितलं आहे. सॅमसंगच्या नोएडा इथल्या कारखान्याला जोंग - ही यांनी भेट दिल्यानंतर ते बोलत होते. भारतात गुंतवणूक करणारी सॅमसंग ही पहिली कंपनी असून नोएडा इथली आमची कंपनी जगातली सर्वात मोठी उत्पादक कंपनी म्हणून नावारुपाला आल्याचं जोंग यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा कुस्तीपटू अमन सेहरावत यानं काल पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात फ्रीस्टाइल स्पर्धेत कांस्यपदकाला गवसणी घातली. त्यानं प्युर्टो रिकोच्या डेरियन क्रूजला १३-५ असं हरवलं. पॅरिस ऑलिम्पिकमधलं हे भारताचं सहावं आणि कुस्तीतलं पहिलं पदक आहे. २१ वर्षं आणि २४ दिवस वय असलेला अमन ऑलिम्पिक पदक पटकावणारा सर्वात कमी वयाचा भारतीय ठरला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या यशाबद्दल अमन सेहरावत याचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताची पैलवान रीतिका हूडा ७६ किलो वजनी गटात मैदानात उतरणार आहे.

दरम्यान, ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावलेल्या भारताचा पुरुष हॉकी संघाचा क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी आज सत्कार केला. या संघानं जागतिक पातळीवर केलेल्या कामगिरीमुळे संपूर्ण देशाची मान उंचावली गेली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. काही काळापूर्वी त्यांना कर्करोगाचं निदान झालं होतं. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर मुंबईतल्या ओशिवरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

मराठी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका केल्या. १९८० आणि ९०च्या दशकात त्यांनी रंगभूमीवर केलेल्या विनोदी भूमिका प्रचंड गाजल्या. प्रायोगिक रंगभूमीवरुन कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या कदम यांनी टुरटूर या नाटकाद्वारे व्यावसायिक रंगमंचावर पदार्पण केलं. त्यानंतर विच्छा माझी पुरी

करा, हे त्यांचं वगनाट्यही रसिकांनी उचलून धरलं. ‘हलकंफुलकं’ हे देखील त्यांचं लोकप्रिय नाटक. प्रभावी आवाज, संवादफेक आणि भूमिकेत शिरुन सादर करण्याची त्यांची क्षमता ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्यं. रथ चक्र या नाटकातून तसंच मोठ्या आणि छोट्या रुपेरी पडद्यावरही त्यांनी अनेक अनेक भूमिकांमधून सकस अभिनयाचं प्रत्यंतर दिलं. नाट्यदर्पणचा सर्वोत्कृष्ट लोकनाट्य कलाकाराचा पुरस्कार त्यांना मिळाला होता.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विजय कदम यांना समाज माध्यमावरच्या संदेशातून आदरांजली वाहिली आहे. एक अष्टपैलू अभिनेता हरपल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम पाऊस तर उत्तर कोंकणातल्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि वादळ तसंच सोसाट्याचा वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केला आहे.